# विसर्जनस्थळांची स्वच्छता

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : स्वच्छ भारत अभियानानुसार, यंदाचा गणेशोत्सव अदानी इलेक्ट्रिसिटीचे कर्मचारी 'स्वच्छता ही सेवा' या चळवळीत योगदान देण्याची शपथ ग्रहण करून साजरा करत आहेत. याचा भाग म्हणून मुंबईत ठिकठिकाणी रस्त्यांच्या स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होत आहेत.

एक संघ या नात्याने काम करीत, जवळपास २ हजार ५०० कर्मचारी हे वेगवेगळ्या पथकांतर्गत काम करतील. ज्यात अतंर्गत कचरा एकत्र करणार आहेत. स्वच्छ भारत अभियानाचे यंदाचे चौथे वर्ष आहे. उपक्रमाद्वारे शहराच्या वेगवेगळ्या भागांतून कचरा गोळा करत शहर स्वच्छ राखण्यासाठी योगदान देतील. स्वच्छता मोहिमेंतर्गत विसर्जन स्थळांनाही सामावून घेतले जाणार आहे.